राज्य सीईटी कक्ष, मुंबई
आवक क्रमांक २२९७
दिनांक २६.०६.१९
शाखा
प्र.अ. आयुक्त

महाराष्ट्र शासन

क्र. सीबीसी २०१९/प्र.क्र.१०७/मावक
विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार,मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २६ जून, २०१९.

प्रति,

आयुक्त,
राज्य समाईक प्रवेश परीक्षा कक्ष तथा
सचिव,
प्रवेश नियामक प्राधिकरण,मुंबई

**विषय :- महाराष्ट्र राज्यातील समाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एस.ई.बी.सी) प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या जात वैधता प्रमाणपत्राबाबत.**

संदर्भ :- उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दि. २१ जून, २०१९ रोजीचे पत्र.

महोदय,

सदंर्भाधिन दि. २१ जून, २०१९ रोजीचे उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय,मुंबई यांचे पत्र विमुक्त जाती,भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग कल्याण विभागास प्राप्त झाले आहे. तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली वैद्यकीय तसेच इतर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाची प्रक्रिया सुरु करण्यात आली असल्याचे सदर पत्रान्वये या विभागास अवगत करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे मागासवर्गातील विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतना जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असल्याचेही सदर पत्रात स्पष्ट करण्यात आहे आहे.

२. उक्त परिच्छेदात नमूद बाब व त्याअनुषगाने नव्याने निर्माण करण्यात आलेल्या सामाजिक शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गातील (एस.ई.बी.सी) विद्यार्थ्यांचे जात वैधता प्रमाणपत्र याविषयी चर्चा करण्यासाठी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवन, मुंबई येथे दि. २६/०६/२०१९ रोजी सकाळी १०.३० वा बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत झालेल्या सर्वकक्ष चर्चेअंती सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासप्रवर्ग हा महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० चा भाग नसल्याचे सर्वानुमते निश्चित करण्यात आले. या पार्श्वभूमीवर सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना वैद्यकीय व इतर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी पुढील शासन आदेश/ सूचना निर्गमित होईपर्यंत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची सक्ती करण्यात येवू नये, असा निर्णय बैठकीत घेण्यात आला.



Scanned with CamScanner

३. उक्त परिच्छेदात नमूद वस्तुस्थिती अनुलक्षून विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागामार्फत मला आपणास असे कळविण्याचे आदेश आहेत की, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासप्रवर्गातील (एस.ई.बी.सी) विद्यार्थ्यांना वैद्यकीय व इतर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी जात वैधता प्रमाणपत्राची सक्ती शासनाचे पुढील आदेश/ सूचना निर्गमित होईपर्यंत करण्यात येऊ नये.

४. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष तसेच प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास प्रवार्गतील विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया सदर सूचनांनुसार निरंतर सुरु ठेवण्याची याद्वारे विनंती करण्यात येत आहे.

आपला

(रविंद्र गुरव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई यांना त्यांच्या दि.२१ जून, २०१९ रोजीच्या पत्रास अनुलक्षून अग्रेषित करुन सदर पत्रातील सूचना संबंधितांच्या निदर्शनास आणण्याची विनंती करण्यात येत आहे.

२) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई, महाराष्ट्र राज्य

By Registry
ISSUED
26/6/2019



Scanned with CamScanner